Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

दरपत्रक सूचना क्र. कोविमं/ भांडार/ K - २४/२०२५-२०२६/1080 दिनांक :- 16 MAR 2026

# * दरपत्रक सूचना *

## विविध प्रकारची पाकीटे छपाईबाबत दरपत्रक मागविणेबाबत.

या कार्यालयासाठी पाकीटांची छपाई करुन घेणेसाठी अधिकृत पुरवठादार यांचेकडून दिनांक १६/०३/२०२६ ते २५/०३/२०२६ या कालावधीत सोबत जोडलेल्या नमुन्यात अटी व शर्तीच्या अधीन राहून अधिकृत दरपत्रकानुसार सीलबंद पाकीटाव्दारे दरपत्रक मागणी करण्यात येत आहेत. दरपत्रक फॉर्म किंमत रु.२००/- इतकी असून ती ना परतावा आहे. निविदा फॉर्म दिनांक २५/०३/२०२६ पासून सकाळी १० ते सायंकाळी ४.०० या वेळेत मंडळ कार्यालयात रोखीने विक्रीसाठी उपलब्ध आहेत. तसेच सदर फॉर्म संकेतस्थळावरदेखील उपलब्ध करुन देण्यात आला असून जे दरपत्रकधारक संकेतस्थळावरील निविदा फॉर्म download करुन उपलब्ध करुन घेतील व वापरतील त्यांना रु.२००/- चा D.D. दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.

दिनांक २५/०३/२०२६ रोजी सांय. ५.०० वाजेपर्यंत प्राप्त होणा-या दरपत्रकांचाच विचार करण्यात येईल तद्नंतर प्राप्त दरपत्रके कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतली जाणार नाहीत.

Digitally signed by
Subhash Rajaram Chougule
Date: 12-03-2026 19:24:30

(सुभाष रा.चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

**निविदा फॉर्म किमंत रु.२००/- ना परतावा**

Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education Kolhapur Divisional Board Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

**निविदा क्र. के - २४ / भांडार / पाकिटे छपाई /२०२५-२०२६ / 1080** 16 MAR 2026

**परिशिष्ट - अ**

विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर या कार्यालयामार्फत सन २०२५-२०२६ या वित्तीय वर्षाकरिता खालील नमूद अटी व शर्ती नुसार तसेच परिशिष्ठ ब मध्ये दर्शविलेल्या तपशिलाप्रमाणे पाकिटे छपाई करुन पुरवठा करणेसाठी **दिनांक १६/०३/२०२६ ते दिनांक २५/०३/२०२६ या कालावधीत - निविदा मागविण्यात येत आहे.** पाकिटे छपाई करुन पुरवठा करणे या कामाचे अंदाजित निविदा मूल्य (Estimated Cost) रू.४,००,०००/- (रूपये चार लाख फक्त) आहे.

**अटी व शर्ती**

**निविदेसाठी अ व ब लिफाफा पध्दत आहे.**

**अ-लिफाफ्यात सादर करावयाची कागदपत्रे (तांत्रिक लिफाफा)**

१ मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ अन्वये अद्ययावत व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र.

२ बयाणा रक्कम रूपये १२,०००/- (रूपये बारा हजार फक्त) धनाकर्ष ( D.D.) बयाणा रक्कमेचा धनाकर्ष (D.D.) विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर या नावाने राष्ट्रीयकृत बँकेचा असावा. बयाणा रक्कम धनादेश स्वरुपात स्विकारली जाणार नाही. तसेच लघु उदयोजक नोंदणी अथवा रजिस्टर्ड सोसायटी अशा निविदाधारकांना बयाणा रक्कम भरण्यापासून सूट मिळणार नाही. तसेच मंडळाकडे जमा असलेली व अन्य निविदेसाठी भरलेली बयाणा रक्कम प्रस्तुत निविदेसाठी ग्राहय धरली जाणार नाही.

३ वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्राची (GST) सांक्षांकित प्रत

४ सन २०२४-२०२५ चे आयकर भरणा विवरण पत्र व पॅन कार्डची सांक्षांकित प्रत.

५ रुपये ४०,०००/-इतक्या रक्कमेचे बँक गॅरंटी (Bank Guarantee)

६ सन २०२४-२०२५ चे GST भरणा विवरण पत्र / पोहोच (Return / Acknowledgement)

७ निविदाधारकास तत्सम कामाचा मागील चार वर्षाचा अनुभव असल्याचे प्रमाणपत्राची सांक्षांकित प्रत. कार्यादेश ग्राहय धरले जाणार नाहीत.

८ निविदाधारक यांचे मुद्रणालयाची स्थापित क्षमता (क्षमता प्रमाणपत्र)

९ व्यवसायकर भरण्याची सन २०२४-२०२५ ची पावती

१० बँक पासबुक पहिल्या पानाची प्रत व मागील तीन महिन्याचे बँक स्टेटमेंट.

**ब -लिफाफ्यात सादर करावयाची कागदपत्रे**

१ उपरोक्त निविदेसाठी मंडळाचे अधिकृत दरपत्रक.

उपरोक्त १ ते १० ची सर्व कागदपत्रे अ लिफाफा मध्ये सादर करावीत. कागदपत्रे अपूर्ण असल्यास अथवा त्यात त्रूटी असल्यास सदर निविदा तांत्रिकदृष्टया अपात्र करण्यात येईल. तांत्रिकदृष्टया पात्र निविदाधारकांचे नमुने कार्यालयात अथवा बाजारपेठेत स्वतंत्र समक्ष यंत्रणेद्वारे तपासण्यात येईल. सदरचे नमुने निकषाप्रमाणे नसल्यास सदर निविदाधारकास अपात्र ठरविण्यात येईल. वरील दोन्ही प्रकारे अपात्र ठरलेल्या निविदाधारकांच्या ब लिफाफ्याचा (दरपत्रक) विचार केला जाणार नाही.

# निविदा अटी व शर्ती

१ निविदेतील अटी व शर्तीप्रमाणे अ लिफाफा (तांत्रिक) मधील माहिती परिपूर्ण व निकषानुसार असल्याशिवाय लिफाफा ब (दरपत्रक) उघडला जाणार नाही.

२ कमी रक्कमेची अथवा जादा रक्कमेची निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे हे अधिकार मंडळाच्या सक्षम समितीस राहतील. याबाबत कोणत्याही प्रकारची कारणे किंवा स्पष्टीकरण देण्यात येणार नाही.

३ अटी असलेल्या किंवा संदिग्ध निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत. अमान्य निविदाधारकाची बयाणा रक्कम निविदासंबंधीची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर आपले मागणी पत्र सादर केल्यानंतर परत करण्यात येईल. निविदेच्या अटी शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदापैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा हक्क मंडळाने राखून ठेवलेला आहे.

४ लघुउद्योजक म्हणून नोंदणी केलेल्या अथवा रजिस्टर्ड सोसायटी, सेवा सहकारी संस्था अशा निविदाकारांना बयाणा रक्कम/अनामत भरण्यापासून सूट मिळणार नाही. तसेच मंडळाकडे जमा असलेली वा अन्य निविदेसाठी भरलेली बयाणा रक्कम प्रस्तुत निविदेसाठी ग्राह्य मानली जाणार नाही.

५ मान्य निविदाधारकास पुरवठयाबाबत विहित नमुन्यात स्वखर्चाने रूपये - ५००/- रक्कमेच्या मुद्रांक शुल्कावर करार करणे बंधनकारक राहील. करार करण्यास असमर्थता दर्शवल्यास बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल

६ निविदेतील मान्य दर करारनाम्यात नमूद दिनांकापासून एक वर्ष कालावधीसाठी अथवा पुढील वर्षासाठीची निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत बंधनकारक राहतील. तोपर्यत मक्तेदारांनी जुन्या मान्य दरानेच विविध पाकीटे छपाई पुरवठा करावायाचा असून त्यामध्ये कोणत्याही प्रकारची भाववाढ दिली जाणार नाही.

७ मंडळाचे कामकाज हे महत्त्वाचे व तातडीचे असल्याने ते वेळेत पूर्ण करणे आवश्यक असलेने मागणीप्रमाणे त्वरीत पुरवठा या तत्वानुसार सेवा देणे मक्तेदारावर बंधनकारक राहील.

८ या कार्यालयाची सर्व महत्वाची तातडीची कामे विचारात घेता ठेकेदाराने सेवा तातडीने व समाधानकारक देणे आवश्यक राहील. छपाई साहित्याचा पुरवठा नमुन्याप्रमाणे न करणे, वेळेचे बंधन न पाळणे व सेवा अनियमित असणे या कारणाकरिता पुरवठा दाराशी केलेला करार केव्हाही संपुष्टात आणण्याचा अधिकार मंडळास राहील. सेवा असमाधानकारक असलेस सुरक्षा ठेव जप्त करण्याचा अधिकार मंडळ कार्यालयास राहील.

९ मान्य निविदाधारकास रू.२०,०००/- (रूपये वीस हजार फक्त) इतकी रक्कम सुरक्षा ठेव (सिक्युरिटी डिपॉझिट) स्वरूपात मंडळाकडे धनाकर्षाद्वारे करार कालावधीकरीता जमा करावी लागेल. मान्य ठेकेदाराची सुरक्षा ठेव निविदा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर ठेकेदाराच्या लेखी मागणीनुसार परत करण्यात येईल. सदर रक्कमेवर कोणतेही व्याज वा लाभांश मंडळाकडून देय असणार नाही.

१० पाकिटासाठी ९० GSM चा कागद वापरण्यात यावा कागदाचे GSM कमी आढळल्यास शासन नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात करण्यात येईल.

११ विविध पाकिटे छपाई करून मालाचा पुरवठा स्वखर्चाने करावा लागेल. साहित्य कार्यालयात पोहोचे पर्यंत ठेकेदाराची जबाबदारी राहील. मुदतीत मालाचा पुरवठा न केल्यास देयकातुन दंडात्मक कपात करण्यात येईल. मालाचा/साहित्याचा पुरवठा विलंबाने केल्यास रू.२,००,०००/- पर्यंत देयक असल्यास १०% प्रत्येक आठवडयास व रू.२,००,०००/- वरील पुरवठा आदेशाच्या ५% प्रत्येक आठवडयास दंड आकारला जाईल. सदर दंडाची रक्कम देयकातून अथवा सुरक्षा रकमेतून वसूल करण्यात येईल याचा पूर्ण अधिकार कार्यालयाकडे राहिल.

१२ दिलेल्या दरामध्ये GST, वस्तुची बांधणी तसेच वस्तु या कार्यालयात पोहचविण्यासाठी लागणाऱ्या वाहतुक, हमाली इत्यादी सर्व खर्चाचा समावेश असावा. दर सर्व करांसह असणे आवश्यक आहे.

१३ निविदा मान्य नमुना साहित्य व कार्यालयास पुरवठा केलेले साहित्य या मध्ये तफावत आढळलेस सदर साहित्याचा स्विकार केला जाणार नाही.

१४ सदरची निविदा वार्षिक असलेने संपूर्ण वर्षभराचे कालावधीमध्ये मंडळ गरजेनुरुप वेळोवेळी पुरवठा आदेश देऊन वस्तुची मागणी करेल

१५ पाकिटाचे नमुने तपासणी इतर संस्थेकडून प्रमाणित करुन घेणेसाठी होणारा खर्च ठेकेदाराने करावयाचा आहे

१६ मान्य निविदाकाराने सुरक्षा ठेव जमा केल्यानंतर व करारनामा स्वाक्षरीनंतर पुरवठा आदेश/ कार्यादेश देण्यात येईल.

१७ कराराच्या कालावधी दरम्यान उपरोक्त संदर्भात जर काही वाद/तंटा उद्‌भवल्यास तो फक्त कोल्हापूर येथील न्यायालयाच्या (कोर्टाच्या) कार्यकक्षेतच चालेल.

१८ मक्तेदाराने सादर केलेली निविदा व निविदेतील दर लिफाफा ब उघडलेनंतर १२० दिवसांपर्यंत वैध राहील.

१९ संक्षिप्त निविदा सूचना व सविस्तर सूचना संचाचा एक भाग राहील

२० करारातील शर्तीनुसार मक्तेदार जर नुकसान भरपाईस जबाबदार असेल तर खालीलपैकी कोणतेही एक अगर सर्व मार्ग स्विकारणेचा अधिकार माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर यांना राहील.

अ) कंत्राट रद्द करणे यामध्ये ठेकेदाराची सर्व रक्कम जप्त करणे.

ब) मंडळाने सोपविलेले काम अन्य मक्तेदाराकडून करवून घेतलेस होणाऱ्या नुकसानीस मक्तेदार जबाबदार राहील. त्याकडून ती रक्कम वसूल करणेत येईल.

क) मंडळाच्या सूचनेनुसार करारानुसार काम करणेस नाकारलेस मक्तेदाराचे नाव काळया यादीमध्ये घालणेचा संपूर्ण अधिकार विभागीय मंडळास राहील.

२१ देयकातून आयकर विभागाच्या १९४ सी कलमानुसार २ % आयकर (TDS) कपात करण्यात येईल

२२ देयकातून शासन आदेशानुसार GST कपात करण्यात येईल.

२३ दरपत्रकामध्ये खाडाखोड दिसून आल्यास अशी दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

२४ निविदा उघडल्यानंतर न्यूनतम निविदाधारकाने (L१) निविदा प्रक्रियेतून माघार घेतल्यास सदर निविदाधारकांची बयाणा रक्कम जप्त करणे / दंड वसूल करणे / काळया यादीमध्ये टाकणे याबाबतचे अधिकार विभागीय मंडळास राहतील.

२५ आवश्यकतेनुसार कराराची मुदत वाढविणेचे अथवा कमी करणेचे अधिकार विभागीय मंडळास राहतील. जर करारास मुदतवाढ दिली तर वाढीव कालावधीत पूर्वीच्याच दराने काम पूर्ण करुन द्यावे लागेल.

२६ मालाचा पुरवठा कार्यालयात पोहोच करेपर्यंत ठेकेदारांची पूर्ण जबाबदारी राहील. पुरवठा करताना काही आपत्ती उद्भवल्यास त्या नुकसानीची पूर्ण जबाबदारी ठेकेदारांची राहील.

२७ दरपत्रक मंजुरी बाबत खरेदी समिती मूल्यांकन किंवा इतर पर्यायानुसार L१ ठरवेल व कार्यालयाचे सोईनुसार योग्य तो निर्णय घेईल.

***निविदा अटी व शर्ती फॉर्म निविदाधारकाने स्वाक्षरी करून शिक्क्यासह जोडणे आवश्यक आहे.***

Digitally signed by
Subhash Rajaram Chougule
Date: 12-03-2026 19:24:02

**(सुभाष रा.चौगुले)**
**विभागीय सचिव,**
**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४१६ ००४**

स्थळ :-कोल्हापूर
दिनांक: /०३/२०२६

Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

**परिशिष्ट - ब**

**निविदा क्रमांक के- २४/ भांडार / पाकीटे छपाई /२०२५ - २०२६**

**पाकीटे छपाईबाबतचे अधिकृत दरपत्रक**

१) निविदा धारकाचे नांव व पत्ता : ----------------------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------

दुरध्वनी क्रमांक ------------------ मोबाईल क्रमांक ------------------------- email : ---------------------

----------------------------------------------------------------------------------------------------कागदाचा

नमुना सादर केला आहे / नाही ------------------------

| अ. क्र. | पाकीटांचा तपशील | छपाईची संख्या (अंदाजे) | प्रती हजार दर (कागद, छपाई, वाहतूक खर्च व सर्व करांसहीत) | नमुना जोडला आहे / नाही |
|---|---|---|---|---|
| १ | विंडो पाकिट (इ.१० वी व इ. १२ वी) आकार- १५.५"X ९" छपाईसह ९० GSM (ब्राऊन पेपर) (नमुन्याप्रमाणे) | १,००० | | |
| २ | क्राफ्ट पाकिट - (शाखा एन) आकार- १५.५"X ९" छपाईसह ९० GSM (ब्राऊन पेपर) (नमुन्याप्रमाणे) | १,००० | | |
| ३ | क्राफ्ट पाकिट नंबर - १ (नमुन्याप्रमाणे) आकार- ६"X ५" छपाईसह ९० GSM (ब्राऊन पेपर) | ५,००० | | |
| ४ | क्राफ्ट पाकिट नंबर - ४ आकार- ११ "X ५" छपाईसह ९० GSM (ब्राऊन पेपर) (नमुन्याप्रमाणे) | १०,००० | | |
| ५ | क्राफ्ट पाकिट नंबर - ६ आकार- १२.५"X ५" छपाईसह ९० GSM (ब्राऊन पेपर) (नमुन्याप्रमाणे) | ३,००० | | |
| ६ | क्राफ्ट पाकिट नंबर - ११ आकार- २०" X १३" छपाईसह ९० GSM (ब्राऊन पेपर) (नमुन्याप्रमाणे) | १०,००० | | |
| ७ | टॉप सिक्रेट, 'ए' (इ.१२ वी) एमएल, पाकिट नं. १ क्राफ्ट पाकिट आकार- १२.५"X ५" ९० GSM (ब्राऊन पेपर लाल शाई) (नमुन्याप्रमाणे) | ४,००० | | |
| ८ | BY REGISTERED A. D. POST [D] S.S.C. (इयत्ता १०वी) आकार- ११.५"X ५" ९० GSM (ब्राऊन पेपर काळी शाई) (नमुन्याप्रमाणे) | ७,००० | | |
| ९ | BY REGISTERED A. D. POST [D] H.S.C. (इयत्ता १२ वी) आकार- ११.५"X ५" ९० GSM (ब्राऊन पेपर काळी शाई) (नमुन्याप्रमाणे) | १,००० | | |
| १० | ग्रेड लिस्ट पाकिट (इ.१०वी) क्राफ्ट पाकिट नंबर - ६ आकार- १५.५"X ९" छपाईसह ९० GSM (ब्राऊन पेपर) (नमुन्याप्रमाणे) | १,००० | | |
| ११ | खाकी डांबर कोटेड पाकिट नंबर ११ आकार- १८.५"X १२" ९० GSM (नमुन्याप्रमाणे) | १,००० | | |
| १२ | इ.१० वी प्रात्यक्षिक [Br.P-१/S.S.C./NO.३] BILL FOR REMUNERATION क्राफ्ट पाकिट नंबर ४ आकार- १२.५"X ६" ९० GSM (ब्राऊन पेपर) (नमुन्याप्रमाणे) | २,००० | | |

| अ. क्र. | पाकीटांचा तपशील | छपाईची संख्या (अंदाजे) | प्रती हजार दर (कागद, छपाई, वाहतूक खर्च व सर्व करांसहीत) | नमुना जोडला आहे / नाही |
|---|---|---|---|---|
| १३ | इ.१० वी प्रात्यक्षिक परीक्षा इनर कव्हर पाकिट क्राफ्ट पाकिट नंबर २ आकार- १२.५"X ५" ९० GSM (ब्राऊन पेपर) (नमुन्याप्रमाणे) | २,००० | | |
| १४ | उत्तरपत्रिकासाठी मोठे क्लॉथ लाईन पाकिट (इ.१०वी) (प्रात्यक्षिक परीक्षा) आकार- १९.५"X ११" ९० GSM (ब्राऊन पेपर) (नमुन्याप्रमाणे) | १,००० | | |
| १५ | ग्रेड लिस्ट पाकिट (इयत्ता १२ वी) क्राफ्ट पाकिट नंबर - ६ आकार- १५.५"X ९" छपाईसह ९० GSM (ब्राऊन पेपर) (नमुन्याप्रमाणे) | १,००० | | |
| १६ | उत्तरपत्रिकासाठी मोठे क्लॉथ लाईन पाकिट (इ.१२वी) (प्रात्यक्षिक परीक्षा) आकार- १९.५"X ११" ९० GSM (ब्राऊन पेपर) (नमुन्याप्रमाणे) | १,००० | | |
| १७ | इ.१२ वी प्रात्यक्षिक [Br.P-१/H.S.C./NO.३] BILL FOR REMUNERATION क्राफ्ट पाकिट नंबर ४ आकार- १५.५"X ६" ९० GSM (ब्राऊन पेपर) (नमुन्याप्रमाणे) | १,००० | | |
| १८ | इ.१२ वी प्रात्यक्षिक परीक्षा पाकिट (मार्कलिस्टसाठी) आकार- १५.५"X ६" ९० GSM (ब्राऊन पेपर) (नमुन्याप्रमाणे) | १,००० | | |
| १९ | इ.१२ वी प्रात्यक्षिक परीक्षा Despatch of Absentee Report & Out of Turn Candidates आकार- १५.५"X ७" ९० GSM (ब्राऊन पेपर) (नमुन्याप्रमाणे) | १,००० | | |
| २० | इ.१२ वी प्रात्यक्षिक परीक्षा Confidential Material HSC Practical Examination आकार- १८.५"X १२" ९० GSM (खाकी डांबर कोटेड पेपर) (नमुन्याप्रमाणे) | १०,००० | | |
| २१ | इ.१०वी / इ.१२ वी तोंडी परीक्षा मार्कलिस्टसाठी क्राफ्ट पाकिटे आकार- १५.५"X ७" ९० GSM (ब्राऊन पेपर) (नमुन्याप्रमाणे) | | | |
| | १) इ.१० वी | ५,००० | | |
| | २) इ.१२ वी | ३,००० | | |
| २२ | इ. १२ वी तोंडी / अंतर्गत मूल्यमापन / प्रकल्प अहवाल प्रात्यक्षिक परीक्षा गुणतक्ते पाकिटे आकार - १५.५"X ११" (नमुन्याप्रमाणे) | १००० | | |

उपरोक्त प्रमाणे कार्यालयास आवश्यक असलेले साहित्याचे अंदाजे परिमाण देण्यात आले आहे. कार्यालयाच्या गरजेनुसार साहित्याच्या मागणीमध्ये कमी / जास्त प्रमाणात बदल होवू शकेल. निविदेतील सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असून त्या मला मान्य आहेत.

स्थळ : कोल्हापूर
दिनांक: /० /२०२६

**निविदाधारकाची सही व रबरी शिक्का**